# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २८० - २२** **दिनांक १५/०९/२०२२**

## अनोळखी महिलेच्या खूनाचा उलगडा करुन क्लिष्ट गुन्हयाची उकल वसई पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक २६/०७/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा.च्या सुमारास वसई पोलीस ठाण्याचे हद्दीतील सर्वे नं १५७ भुईगाव कळंब खाडीच्या ठिकाणी पाण्यात किना-यावर एक अर्धवट उघडी रेग्जीनची ट्रॉली बॅगेमधुन घाण वास येत असल्याने ती बॅग खाडीच्या पाण्यातुन बाहेर काढली असता त्यात एक अंदाजे २० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील स्त्री जातीचा मृतदेह शिर नसलेले धड अशा स्थितीत दिसुन आला. त्या मृतदेहावर उजव्या हातावर लाल काळ्या रंगाचे माराचे व्रण तसेच मानेवर धारधार शस्त्राने महिलेचे धड अलग केल्याचे दिसुन आले. त्यावरुन वसई पोलीस ठाण्यात दिनांक २६/०७/२०२१ रोजी भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर महिलेचे शिर हे धडापासून वेगळे केले असल्याने मयत महिलेची ओळख पटविणे जिकरीचे असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून यातील मयत महिलेची ओळख पटवून सदर गुन्हां उघडकीस आणण्यासाठी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपायुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली व त्यानुसार आयुक्तालातील तसेच लगतचे मुंबई, ठाणे, ठाणे ग्रामीण, पालघर जिल्हयातील व राज्यातील मिसिंग महिलांची माहिती प्राप्त करुन अनोळखी मयत महिलेशी, तिने परिधान केलेल्या कपडयांचे साधर्म्य तपासण्यात आले. दमण, वापी, गुजरात या ठिकाणी कोस्टल पोलीस ठाणे हद्यीतील मिसिंग महिलांचा तपास केला गेला.

त्यादरम्यान दिनांक २९/०८/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाणे येथे महिला नामे कमरुनिसा मोहम्मद अली निपानी रा. बेळगाव, कर्नाटक यांनी मानव मि.रजि.नं ११२/२०२२ दिली होती. त्यात त्यांची नात नामे सानिया आसिफ शेख वय २४ वर्षे, रा. नालासोपारा (पुर्व) हि मागील १३ महिन्यापासुन बेपत्ता असल्याबाबत खबर होती. सदर मिसिंग दिर्घ कालावधीनंतर दाखल करण्यात आली असल्याने व तिचे वर्णन हे गुन्हयांतील अनोळखी मयत महिलेच्या वर्णनाशी मिळते-जुळते असल्याने नमुद खबर देणारी महिला व मिसिंगचे नातेवाईक यांचेकडे चौकशी केली असता बेपत्ता महिला हिचे पती आसिफ हनिफ शेख, रा. नालासोपारा (पुर्व) यांनी ती बेपत्ता झालेबाबत कोठेही पोलीस ठाण्यात खबर दिली नसल्याचे व ते नमुद राहता पत्ता सोडुन मुंब्रा येथे राहण्यास गेले असल्याचे समजले. एकंदरीत सर्व प्रकार हा संशयास्पद असल्याने बेपत्ता महिलेचा

पती याचेकडे सखोल चौकशी केली असता सदरची महिला ही गुन्हयांतील अनोळखी मयत महिला असल्याचे व त्यानेच तिला जिवे ठार मारल्याचे निष्पन्न झाल्याने तिचा पती नामे आसिफ हनिफ शेख यास दिनांक १४/०९/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. ऋषीकेष पवळ, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अब्दुलहक देसाई, पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि राम सुरवसे, सुनिल पवार, सागर चव्हाण, पोउनि विष्णू वाघमोडे, स.फौ. जयंत पाटणकर, पो.हवा. सुनिल मलावकर, पो.हवा. विनोद पाटील, पो.ना.मिलिंद घरत, पो.अं. शरद पाटील, विनायक कचरे, सुर्यकांत मुंढे, भरत शेलार, बाळू गर्जे, नांदगांवकर यांनी केलेली आहे.



----ooo-----